# रयत शिक्षण संस्थेची वाटचाल नव्या दिशेने..

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रयत्नातून १९१९ साली आकारास आलेली आणि महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सामाजिक जीवनाचा आधारवड ठरलेली रयत शिक्षण संस्था या वर्षी आपल्या स्थापनेचा शतकमहोत्सव साजरा करीत आहे. रयत शिक्षण संस्थेने टाटा टेक्नोलॉजी पुणे,सायन्स ॲन्ड टेक्नोलॉजी पार्क पुणे याच्या संयुक्त विद्यामाने शतक महोत्सवाचे औचित्य साधून नवसंकल्पना आणि विकासास सहाय्य तसेच अशा नवसंकल्पनांच्या पेटंटची नोंदणी आणि त्यातून नवउद्योग निर्मिती अशा प्रवासास सहाय्यभूत ठरणारी केंद्रे महाराष्ट्रभर पसरलेल्या आपल्या शाखांपैकी यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स ,सातारा रयत रिसर्च सेंटर खारघर (नवी मुंबई), एस.एम.जोशी कॉलेज हडपसर (पुणे) व रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय कार्यालय अहमदनगर या चार ठिकाणी सेंटर फॉर इन्व्हेन्शन,इनोव्हेशन आणि इन्क्युबेशन (सी - आयआयआय) या केंद्रांच्या स्थापनेव्दारे ज्ञानविकासाचा त्रिवेणी संगम साधण्याचा संकल्पा सोडला आहे.

यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स,सातारा,येथील यशवंतराव चव्हाण सेंटर फॉर इन्व्हेन्शन,इनोव्हेशन आणि इन्क्सुबेशन (वायसी-सीआयआयआय) या केंद्रामध्ये ऑटोमेकॅट्रॉनिक्स या विषयांतर्गतक ऑटोमोबाईल, मेकॅनिकल व इलेक्ट्रॉनिक्स या विषयांचे संयुक्त प्रशिक्षण व संशोधन केले जाईल.

रयत रिसर्च सेंटर खारघर (नवी मुंबई) येथील रयत सेंटेनरी सेंटर फॉर इन्व्हेन्शन,इनोव्हेशन आणि इन्क्युबेशन (आरसी-सीआयआयआय)सर केंद्रामध्ये मेकॅट्रॉनिक्स या विषयांतर्गत मेकॅनिकल ,व इलेक्ट्रॉनिक्स या विषयांचे संयुक्त प्रशिक्षण व संशोधन केले जाईल.

एस.एम.जोशी कॉलेज हडपसर (पुणे) येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील सेंटर फॉर इन्व्हेन्शन,इनोव्हेशन आणि इन्क्युबेशन (एलबीपी-सीआयआयआय) या केंद्रामध्ये ऑटोट्रॉनिक्स या विषयांतर्गत ऑटोमोबाईल व इलेक्ट्रॉनिक्स या विषयांचे संयुक्त प्रशिक्षण व संशोधन केले जाईल.

रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय कार्यालय अहमदनगर येथील कर्मवीर भाऊराव पाटील सेंटर फॉर इन्व्हेन्शन,इनोव्हेशन आणि इन्क्युबेशन (केबीपी-सीआयआयआय) या केंद्रामध्ये ऑटोमेकॅट्रॉनिक्स या विषयांतर्गत ऑटोमोबाईल,मेकॅनिकल व इलक्ट्रॉनिक्स या विषयांचे संयुक्त प्रशिक्षण व संशोधन केले जाईल.

या केंद्रांचे प्रमुख उद्देश तांत्रिक व अतांत्रिक शाखांचे प्रशिक्षण, इन्व्हेन्शन,इनोव्हेशन आणि इन्क्युबेशन यांना प्रोत्साहन देणे हे आहे.या प्रशिक्षणांतर्गत विद्यार्थी व प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण देणे, कार्यरत कर्मचा-यांना त्याच्या क्षेत्रातील विकसीत तंत्रज्ञानाची ओळख व प्रशिक्षण प्राप्त करुन दिले जाणार आहे. तसेच नवसंकल्पनांच्या आधारे नवउद्योग उभारणी कामी देखील प्रेरणा व प्रोत्साहन देणे आणि त्यातून उद्योजकांची नवी पिढी निर्माण केली जाणार आहे.

नवसंकल्पना व संकल्पना यांच्या आधारे नवीन उद्योगांची उभारणी इतकेच नव्हे तर उद्योग उभारणीनंतर देखील अधिकाधिक संशोधन करुन नवनवीन सुधारणांतून अद्ययावतीकरण मार्गदर्शन केले जाईल. छोट्या उद्योगांच्या उभारणीचा पाया या केंद्रामध्ये रचला जाईल. समाजोन्नती व आधुनिक समाजाच्या तांत्रिक व सर्वांगिण जडणघडणी कामी मार्गदर्शकाची भूमिका या संस्थांकडून राबवली जाईल.

प्रशिक्षणांतर्गत तीन पासून नऊ पर्यंत स्तराचे प्रशिक्षण दिले जाणार आहेत.३ व ४ स्तरामध्ये एसएससी /एचएससी आयटीआय,५ व ६ स्तरांतर्गत डिप्लोमा व डिग्री व ७ व ८ स्तरांतर्गत मास्टर ऑफ इंजिनिअरिंग,एमटेक,एमएस झालेल्या विद्यार्थी व प्रशिक्षणार्थी यांची निवड केली जाईल आणि ९ व्या स्तरांतर्गत उद्योगक्षेत्रातील दहा वर्षे कार्यरत असलेल्या तंत्रज्ञाची तसेच संशोधन व विकास क्षेत्रत कार्यरत कर्मचा-यांचा समावेश ९व्या स्तरात केला जाईल.

इनोव्हेशन या अंतर्गत डिझाईन डेव्हलपमेंट,टेस्टींग व प्रोटोटाईप आणि इन्व्हेन्शन या अंतर्गत संशोधन व विकास यांच्या प्रशिक्षण व विकासासाठी सायन्स आणि टेक्नॉलॉजी पुणे यांचे सहाय्य व सहभाग असणार आहे. तसेच इन्क्युबेशनच्या प्रशिक्षण व विकासासाठी सायन्स आणि टेक्नॉलॉजी पार्क पुणे यांची मदत व सहभाग असणार आहे. या अंतर्गत नवसंकल्पना आणि त्यांच्या विकासास सहाय्य तसेच पेटंटची नोंदणी अशा प्रवासास या केंद्रांची मदत होणार आहे.

या अंतर्गत पुणे-कोल्हापूर या औद्योगिक हबमधील सातारा या मध्यवर्ती ठिकाणी टाटा टेक्नोलॉजी पुणे,सायन्स ॲन्ड टेक्नोलॉजी पार्क पुणे यांच्या संयुक्त विद्यामातून यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स येथील यशवंतराव चव्हाण सेंटर फॉर इन्व्हेन्शन,इनोव्हेशन आणि इन्क्युबेशन वायसी-सीआयआयआय ची स्थापना होत आहे.

या प्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील म्हणाले कि,रयत शिक्षण संस्था गेली ९९ वर्षे समाजाच्या आधुनिक शैक्षणिक गरजांच्या पुर्ततेसाठी अग्रेसर राहीली आहे. त्याचाच एक भाग म्हणून आम्ही ,टाटा टेक्नोलॉजी व सायन्स अॅन्ड टेक्नोलॉजी पार्क पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने CIII सेंटरची यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स या महाविद्यालयात उभारणी करीत आहोत.विद्यार्थ्यांच्या गरजेप्रमाणे त्यांना नविन उत्पादनाचा आराखडा नविन विकसीत करणे,अवगत तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वापर करणे व व्यवसाईक संधीची निर्मिती करणे ही या प्रकल्पाची उपयुक्तता आहे.तसेच बी.टेक एम.टेक ,बी.ए. बी.एस्सी.बी.कॉम. व आयटीआय क्षेत्रातील विद्यार्थ्यांना या CIII सेंटर मध्ये चालू होणा-या कोर्सेसचा फायदा होणार आहे.

याप्रसंगी CIII सेंटरचे को-ऑर्डीनेटर प्रा.पी.व्ही.चव्हाण ,कोर्स को-ऑर्डीनेटर प्रा.एस.के.शिंदे, मार्केटींग को-ऑर्डीनेटर प्रा. पी. एस. मुंदडा, उपप्राचार्य डॉ.एच.व्ही. देशमुख, सर्व विभाग प्रमुख मोठया संख्येने उपस्थित होते.आभार ,उपप्राचार्य डॉ.एच.व्ही.देशमुख यांनी आभार मानले सूत्रसंचालन प्रा.रोहीणी शिंदे यांनी केले.

---

जा.क्र. /२०१८-१९ . दि. १६ /१० /२०१८

प्रती,
मा. संपादक,
दैनिक ------
सातारा

महोदय,

सदरची बातमी आपल्या सुप्रसिध्द दैनिकात प्रसिध्द करणेविषयी विनंती आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

प्राचार्य,
यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स,
सातारा